# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

**कार्यासन क्रमांक २अ** क्रमांक विकाअ/शिक्षण/एआरसी/२०१५/39

दिनांक :- 5 JAN 2016

**प्रति,**

**प्राचार्य,**
सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावती.
जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावती.
भोसला कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड रिसर्च, अकोला.
प्रताप इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड टेक्नॉलॉजी, वाशिम.
मानव स्कुल ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, व्याळा, अकोला.

**विषय :- अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांची २०१५ मधील तपासणीत आढळलेल्या त्रृटीबाबत.**
संदर्भ :- १. या कार्यालयाचे दिनांक २० ऑक्टोंबर २०१५ रोजीचे कारणे दाखवा नोटीस.
२. मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २/एनजीसी/लोस/२०१५/१६९१ दि. १९ डिसे २०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाव्दारा आपल्या संस्थेमध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार सोई सुविधा आहे किंवा नाही याबाबतची तपासणी करण्यात आलेली होती. तपासणीमध्ये आपल्या संस्थामध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार सोईसुविधा का पुरविण्यात येत नाही, याबाबतची कारणे ७ दिवसाचे आत सादर करण्यास आपणास कळविलेले होते. तथापी असे निदर्शनास आले की, आपण अजुनपर्यंत खुलासा या कार्यालयास सादर केलेला नाही, ही अत्यंत गंभिर बाब आहे.

तेव्हा याबाबत आपणास पुनश्चः कळविण्यात येते की, सदर प्रकरणी **दिनांक१२/१/२०१६** पर्यंत खुलासा सादर करावा, अन्यथा आपले नाव तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना कळविण्यात येईल.

तसेच सर्व खाजगी विनाअनुदानित संस्थांना कळविण्यात येते की, खुलासा प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे सुनावणी घेऊन सबंधित अहवाल तंत्रशिक्षण संचालनालयास, म.रा., मुंबई यांना सादर करण्यात येईल. तसेच जे अभियांत्रिकी महाविद्यालये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाची पुर्तता करण्यास टाळाटाळ करतात व ज्यांच्या कायम स्वरुपातील व्यापक प्रमाणात त्रृटी आहे अश्या अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या बाबतीत त्रृटीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात येणार आहे, याची सर्व संस्थेनी नोंद घ्यावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी